# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्तालय, मिरा-भाईदर, वसई-विरार**

पोलीस आयुक्त यांचे कार्यालय

**कार्यालयाचा पत्ता-** रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि. ठाणे

फोन नंबर ०२२ - २९४५१००१

Email ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट १०५/२०२५ दिनांक - ०४/०३/२०२५

**प्रेस नोट**

**अवैध वेश्याव्यवसाय करवुन घेणाऱ्या महीला आरोपीस अटक करुन दोन पिडीत महीलांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांना यश.**

----ooo----

तुळींज पोलीस ठाणे हद्दीतील संतोष भुवन, पेल्हार रोड, नालासोपारा पुर्व याठिकाणी एक महीला वेश्यादलाल ही वेश्यागमनाकरीता मुली पुरविणार असल्याची गोपनीय माहीती अनैतीक मानवी वाहतुक शाखेचे पोलीस निरीक्षक सौरभी पवार मॅडम यांना मिळाल्यावरुन पोलीस पथक, बोगस गिऱ्हाईक व दोन पंच असे सदर ठिकाणी जावुन दि.०३/०३/२०२५ रोजी कारवाई करुन महीला वेश्यादलाल रेश्मा पंडीत बोरसे, वय ३१ वर्षे हिस अटक करुन दोन महीला पिडीतांची सुटका करण्यात अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षास यश आले आहे.

सदर बाबत थोडक्यात हकीकत अशी की, मिळालेल्या माहीतीच्या आधारे बोगस गि-हाईक तयार करुन त्यास नमुद वेश्यादलाल रेश्मा हिच्या मोबाईल क्रमांकावर संपर्क करुन वेश्यागमनासाठी मुलीची मागणी केली असता तिने सांगितले की, मी एका मुलीचे १०,०००/- रु घेते आपणास कबुल असेल तर संतोष भुवन, नालासोपारा पुर्व येथे एका ठिकाणी येण्यास सांगितल्यावर बोगस गि-हाईक याने त्यास होकार दिला. त्यानंतर बोगस गिऱ्हाईक हे पंचासह ठरलेल्या ठिकाणी गेले असता वेश्यादलाल रेश्मा बोरसे हिने गिऱ्हाईकास दोन महीला दाखवल्या व त्यामधुन तुम्ही पसंद करा व माझे कमिशन व वेश्यागमनाचा मोबदला म्हणुन मला ठरल्याप्रमाणे पैसे दया असे सांगितल्यावर बोगस गिऱ्हाईक याने दिलेल्या सुचनेप्रमाणे एक महीला पसंद करुन ठरल्याप्रमाणे तिस पैसे दिले त्यावेळी सदर ठिकाणी पोलीस पथकाने छापा टाकून एक महीला दलाल आरोपी रेश्मा पंडीत बोरसे, वय ३१ वर्षे हिस ताब्यात घेतले. व दोन पिडीत महीला यांची वेश्या व्यवसायोपासुन सुटका केली आहे.

यातील वेश्यादलाल रेश्मा पंडीत बोरसे, राहणार- तारापुर, ता.जि. पालघर हिने पिडीत महीलांना पैशाचे आमिष दाखवुन वेगवेगळया ग्राहकांना बोलावुन त्यांचेकडुन पैसे घेवुन पिडीत महीला यांना वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले. तसेच ती वेश्यागमनाचा मोबदला व कमीशन

मिळुन एका महीलेचे एकुण १०,०००/- रु घेते व त्यातील २०००/- रुपये पिडीत महीलांना देत असते.

तरी सदर पिडीत महीला यांची वेश्याव्यवसायाच्या दलदलीतून सुटका करुन नमूद महीला दलाल आरोपी यास अटक करुन तुळींज पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १५०/२०२५ भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम १४३ (२) सह अनैतिक मानवी व्यापार प्रतिबंध कायदा १९५६ चे कलम ४, ५ प्रमाणे आरोपी रेश्मा पंडीत बोरसे, वय ३१ वर्षे हिचेवर गुन्हा दाखल केला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस उप आयुक्त श्री.अविनाश अंबुरे (गुन्हे), सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. मदन बल्लाळ यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध शाखा नालासोपारा युनिटचे पोनि/सौरभी पवार, व सफौ/गवई, मपोहवा/साक्षी डोईफोडे, पोहवा/रोशन किणी, पोहवा/महेंद्र शेटये, पोहवा/अमित चव्हाण, मपोहवा/तिवले, पोहवा/श्याम शिंदे, चालक पोहवा/सुनिल पागी, सर्व नेमणुक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष नालासोपारा यांनी उत्कृष्ठरित्या पार पाडली आहे.

------------oo-----------------